क्र.विकास/कार्या-४/ कावि32 /२०२०.
विभागीय आयुक्तकार्यालय(विकास शाखा),पुणे विभाग,पुणे.
विधान भवन(कौन्सिल हॉल), कँम्प एरिया, पुणे - ४११ ००१.
दुरध्वनी क्रमांक :- ०२० - २६३६ ३०४०
ई मेल :- dcdpune१@gmail.com
दिनांक :-20-02-२०२०.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर.

विषय:- THE HINDU IN SCHOOL वर्तमान पत्र निर्मित दैनिक /साप्ताहिक, मनोविकास प्रकाशन मार्फत प्रसिध्द होणारी पुस्तके व दैनिक सकाळ सोबत येणारी विद्यार्थी मार्गदर्शन पुरवणी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

आजचे युग हे स्पर्धेचे युग असून या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास होणेसाठी त्यांना विद्यार्थी दशेत असतानाच अवांतर वाचनाची व आपले कलागुण जोपासण्याची आवड निर्माण करुन देण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारे त्यांच्यामध्ये व्यक्तिमत्व विकासाचा पाया शालेय जीवनातच घालण्याचा प्रयत्न सर्वांनी करणे गरजेचे आहे.

THE HINDU IN SCHOOL हे एक इंग्रजी साप्ताहिक आहे. या साप्ताहिकामध्ये विज्ञान व त्या आधारे कल्पनाशक्ती वाढविणे, विज्ञानातील तत्वे, रासायनिक पदार्थांचे गुणधर्म, पौष्टिक आहाराचे महत्व, भूतलावरील सजीवसृष्टी व तिचा अभ्यास, प्राणी विश्व, लहान लहान शब्दकोडे, जैवविविधता व पर्यावरणातील घटक, ऐतिहासिक वास्तु इत्यादी बाबतची माहिती समाविष्ट आहे. या माहितीच्या आधारे विदयार्थ्यांच्या कल्पनाशक्तीस चालना मिळून त्याद्वारे त्यांच्यातील कलागुणांमध्ये वाढ होणेस निश्चितच मदत होणार आहे. अंकामध्ये समाविष्ट असलेली चित्रे व भौगोलिक नकाशे विद्यार्थ्यांचे ज्ञानात भर घालणेस उपयुक्त आहेत. अशा काही अंकामध्ये कलाशास्त्राविषयी माहिती, विद्यार्थ्यांसाठी प्राचीन साहित्यांची ओळख, तसेच प्राचीन युगाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जगातील प्रसिध्द / असामान्य व्यक्तींच्या जीवनपटाबाबतची माहिती, तंत्रज्ञाना विषयीची माहिती उपलब्ध आहे. मुलांचे भावविश्व ओळखून टाकाऊ पासून टिकावू वस्तूंच्या निर्मितीबाबतची माहिती, गंमतीशीर कोडयांद्वारे ज्ञानवृध्दी, क्रिडा क्षेत्रातील जागतिक विक्रमाबाबतची माहिती देखील उपलब्ध आहे. हे साप्ताहिक प्रत्येक इंग्रजी /सेमी इंग्रजी माध्यमातील इयत्ता ५ वी ते १२ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी फार उपयुक्त आहे.

THE HINDU YOUNG WORLD या साप्ताहिकामध्ये प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली प्राणी, पक्षी, वनस्पती बाबतची माहिती आहे. तसेच विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या चित्रास स्क्रॅप बूकच्या माध्यमातून प्रसिध्दी देवून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत कलागुणांना वाव दिलेला आहे. लहान लहान गोष्टींच्या माध्यमातून संदेश देवून मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना दिलेली आहे. विविध प्रांतातील सण, उत्सव, पाककृती, प्रवास व पर्यटन, साहसी क्रिडाप्रकार, दूरदर्शनवरील मुलांसाठी उपयुक्त वाहिनींबाबतची माहिती, शब्दकोडे, क्रिडाविश्वाची माहिती इत्यादीवर आधारित उपक्रमाचा समावेश केलेले आहे. सदर साप्ताहिक प्रत्येक शुक्रवारी प्रसिध्द होते. या साप्ताहिकाच्या प्रती प्रत्येक शाळेने ग्रंथालयामध्ये उपलब्ध कराव्यात. तसेच हे साप्ताहिक सर्व विद्यार्थ्यांनी स्वत:साठी घेणेबाबत प्रवृत्त करावे. त्याद्वारे मुलांमध्ये इंग्रजी वाचनाची आवड व गोडी निर्माण होईल. हे साप्ताहिक विद्यार्थ्यांनी घेतल्यास पालकांमध्ये देखील याबाबत जागरुकता निर्माण होऊन हे साप्ताहिक नियमित वाचनास प्रोत्साहन मिळेल. इयत्ता १ ली ते ५ वी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी सदर साप्ताहिक फार उपयुक्त आहे.

THE HINDU IN SCHOOL हे दैनिक सोमवार ते शुक्रवार प्रसिध्द होत असते. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ज्ञानाचा समावेश आहे. सोमवारी प्रसिध्द होणाऱ्या अंकामध्ये सामान्य ज्ञानावर आधारित विज्ञान, तंत्रज्ञान, भूगोल, थोर व्यक्तीमत्वे, विविध राज्यांची व जागतिक स्तरावरील माहिती दिलेली असते. मंगळवारी प्रसिध्द होणाऱ्या अंकामध्ये विद्यार्थ्यांना साहित्याबाबतची तोंड ओळख, जागतिक स्तरावरील आंतरराष्ट्रीय घडामोडीं, नविन संशोधने इत्यादी बाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली असते. बुधवारच्या अंकात, पर्यावरण,

Scanned by CamScanner

वातावरणातील बदलांचे प्राणी जीवांवरील परिणामाबाबत माहिती दिली जाते. गुरुवारच्या अंकामध्ये आरोग्य विषयक उपयुक्त माहिती प्रसिध्द केली जाते. तसेच ऐतिहासिक वास्तू व त्यांचे जतन, जगातील विविध देश/शहरे यांबाबतची माहिती तसेच प्राणीविश्व यांचा उल्लेख आहे. शुक्रवारी प्रसिध्द होणाऱ्या अंकामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त योजना/माहितींचा उल्लेख केला जातो.साप्ताहिक सुट्टीमध्ये कल्पनाशक्तीवर आधारित करावयाच्या उपक्रमांची माहिती समाविष्ट केली आहे. प्रश्नमंजूषाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. दैनिक जीवनाशैलीमध्ये विज्ञानाचे रहस्य समजून घेवून त्याचा वापर करणे, विविध शैक्षणिक उपक्रम राबविणे व त्यावर आधारित अभिप्राय नोंद करणेस दैनिकात वाव टेवलेला आहे. उपरोक्त सर्व अंकामध्ये प्रसिध्द केलेल्या माहितीवर आधारित तयार केलेले कोडे सोडविणेचा उपक्रम विशेष उल्लेखनीय आहे. या अंकामध्ये क्रिडाविश्वातील अद्यावत माहिती दिली जाते. प्रत्येक दिवसाच्या अंकाचे विद्यार्थ्यांना किती आकलन झाले हे पाहण्यासाठी त्या अंकामध्ये समाविष्ट माहितीशी निगडीत प्रश्नमंजूषांचा अंतर्भाव केलेला आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांचे बौध्दिक प्रगतीचे मूल्यमापन करणे सहजशक्य आहे. सदर मासिकाच्या दोन-तीन प्रती शाळेच्या ग्रंथालयात उपलब्ध केल्यास मुलांसाठी एक नाविन्यपुर्ण वाचन साहित्य उपलब्ध होईल.सदरील दैनिक आठवडयातून सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसात उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांनी सुध्दा वैयक्तिकरित्या विकत घेतल्यास त्यांच्या भाषेमध्ये आणि ज्ञानामध्ये निश्चितच भर पडेल.

मनोविकास प्रकाशन पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील अग्रगण्य दर्जेदार पुस्तके प्रसिध्द केली जातात. समाजातील सर्व वयोगटातील वाचकांच्या जाणिवा समृध्द व्हाव्यात व त्यातून सुजाण नागरिक घडावेत हया हेतूने या संस्थेमार्फत राष्ट्रीय स्तरावरील अनेक नामावंत मराठी लेखकांची पुस्तके प्रसिध्द केली आहेत.अतिशिय विचारपूर्वक निर्मिलेली व महत्वाची असणारी ही पुस्तके वाचनातून सहजपणे मनोरंजन करत ज्ञानसंपन्न करणारी आहेत. त्यातील पद्मश्री अरविंद गुप्ता,डॉ.बाळ फोंडके, आनंद घैसास, अच्युत गोडबोले, डॉ. जगन्नाथ दिक्षित आणि केंद्र सरकारचा उपक्रम असलेला होमी भाभा विज्ञान प्रसार केंद्र ही पुस्तके शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत. तसेच शिक्षकांना नावीन्यपूर्ण अस काही शिकण्याची व शिकवण्यास उपयुक्त असणारी पुस्तके या प्रकाशनामार्फत प्रकाशित केलेली आहेत. मनोविकास प्रकाशन यांचेमार्फत पुणे विभागातील पाचही जिल्हयांसाठी त्यांचेकडील प्रकाशित पुस्तके २५ % सवलतीच्या दरात उपलब्ध होणार असलेबाबत कळविले आहे.

तसेच दैनिक सकाळ सोबत येणाऱ्या विद्यार्थी मार्गदर्शन पुरवणी देखील शालेय विद्यार्थ्यांसाठी महत्व पुर्ण आहे.

अंकांचे /पुस्तकांचे / विद्यार्थी मार्गदर्शन पुरवणी उपयुक्ततेबाबत आपले स्तरावरुन पडताळणी करावी. अंक / पुस्तकांचे / विद्यार्थी मार्गदर्शन पुरवणी विद्यार्थ्यांचे कलागुणांस व अवांतर वाचनास उपयुक्त आहेत. आपण प्रयोगिक तत्वावर हे अंक /पुस्तकांचे / विद्यार्थी मार्गदर्शन पुरवणी उपलब्ध करुन घ्यावेत. यासाठी गावातील माजी विद्यार्थी संघ तसेच उच्च शिक्षीत प्रभावशाली व्यक्तीमत्वे स्वंयसेवी संस्था / CSR Fund / GPDP शैक्षणिक तरतुद / शाळेकडील उपलब्ध सादील खर्च / किंवा इतर माध्यमातून निधी प्राप्त करुन हा उपक्रम प्रयोगात्मक दृष्टीने राबवावा.

(डॉ.दिपक म्हैसेकर)
विभागीय आयुक्त
पुणे विभाग पुणे.

प्रत:- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),जिल्हा परिषद पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर.

२) व्यवस्थापक, द हिंदू ग्रुप पब्लीशिंग प्रायव्हेट लिमिटेड, कस्तुरी बिल्डींग, जे टाटा रोड, चर्चगेट मुंबई -४०० ०२०.

३) व्यवस्थापक, मनोविकास प्रकाशन पुणे फ्लॅट -३ ए, चौथा मजला, शक्ती टॉवर, ६७२ नारायण पेट, लोखंडे तालीमजवळ पुणे- ४११ ०३०.

४) व्यवस्थापक, दैनिक सकाळ, ५९५ बुधवार पेठ, पुणे- ४११ ००२.

Scanned by CamScanner

| **डॉ. बाळ फोंडके यानी 'नॅशनल इन्सिटटयूट ऑफ सायन्स कम्युनिकेशन' या संस्थेचे संचालक म्हणून काम केले आहे** | | | |
|---|---|---|---|
| **अनु.क्र** | **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **मूल्य** |
| 1 | हवामान (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 2 | अणू-रेणू (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 3 | गुरुत्वाकर्षण (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 4 | जनुक (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 5 | मेंदू (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 6 | रोगप्रतिकारशक्ती (संपूर्ण रंगीत) | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 7 | कसं? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 8 | का? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 9 | काय? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 10 | किती? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 11 | कुठं? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 12 | केव्हा? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| 13 | कोण? | डॉ. बाळ फोंडके | 90 |
| **पद्मश्री अरविंद गुप्ता यांनी पुण्यातील 'आयुका'च्या 'मुक्तांगण विज्ञान शोधिकेत' अनेक वर्षे काम केले आहे** | | | |
| 1 | खेळ विज्ञानाचे (कृती आणि कौशल्य) | पद्मश्री अरविंद गुप्ता | 190 |
| 2 | हँडस् ऑन अर्थात करून पहा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 140 |
| 3 | उद्योगी व्हा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 140 |
| 4 | असे घडले शास्त्रज्ञ | पद्मश्री अरविंद गुप्ता | 180 |
| 5 | 'ग' गणिताचा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 80 |
| 6 | कथा सौर ऊर्जेची | पद्मश्री अरविंद गुप्ता | 80 |
| 7 | सायकलवाल्या स्त्रिया | पद्मश्री अरविंद गुप्ता | 90 |
| 8 | खेळण्यांचा खजिना | पद्मश्री अरविंद गुप्ता | 50 |
| 9 | सोपी विज्ञान खेळणी | पद्मश्री अरविंद गुप्ता | 60 |
| 10 | छोटी खेळणी, मोठे विज्ञान | पद्मश्री अरविंद गुप्ता | 60 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | काडेपेटी आणि इतर विज्ञान खेळणी | पद्मश्री अरविंद गुप्ता | 70 |
| 12 | टाकाऊतून शिकाऊ | पद्मश्री अरविंद गुप्ता | 70 |
| 13 | कचऱ्यातून करिष्मा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 60 |
| 14 | कचऱ्यातून कमाल | पद्मश्री अरविंद गुप्ता | 60 |
| 15 | कचऱ्यातून चमत्कार | पद्मश्री अरविंद गुप्ता | 60 |
| 16 | करून पहा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 140 |

**जग बदलणाऱ्या जागतिक किर्तीच्या शास्त्रज्ञांची ओळख**

**आय.आय.टी मुंबईचे केमिकल इंजिनीअर असलेल्या अच्युत गोडबोले यांनी**

**जगभरातल्या बड्या आयटी कंपन्यांत सर्वोच्चपदी काम केले आहे.**

| अनु.क्र | पुस्तकाचे नाव | लेखक | मूल्य |
|---|---|---|---|
| 1 | जग बदलणारे जीनियस (विश्वविज्ञान)<br>गॅलिलिओ गॅलिली, आयझॅक न्यूटन,<br>अल्बर्ट आईनस्टाईन, स्टीफन हॉकिंग | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 280 |
| 2 | जग बदलणारे जीनियस (अणुविज्ञान)<br>मेरी क्युरी, लीझ माइट्नर, जे. रॉबर्ट ओपेनहायमर, रिचर्ड फाईनमन | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 280 |
| 3 | जग बदलणारे जीनियस (सूक्ष्मजीव विज्ञान)<br>एडवर्ड जेन्नर , रॉबर्ट कॉख, लुई पाश्चर,<br>अलेक्झांडर फ्लेमिंग | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 280 |
| 4 | तंत्रज्ञ जीनियस भाग – १<br>थॉमस अल्वा एडिसन, ॲलेक्झांडर ग्रॅहम बेल, निकोला टेस्ला, राईट बंधू | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 120 |
| 5 | तंत्रज्ञ जीनियस भाग – २<br>गुग्लिएल्मो मार्कोनी, जॉन लॉगी बेअर्ड, ॲलन ट्युरिंग, स्टीव्ह जॉब्ज | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 120 |
| 6 | तंत्रज्ञ जीनियस भाग – ३<br>बिल गेट्स, जेफ बेझॉस, लॅरी पेज, सर्गी ब्रिन,<br>मार्क झुकरबर्ग | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 120 |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | भारतीय जीनियस भाग – १<br>(आर्यभट, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त) विश्वेश्वरैया, रामानुजन, डी.डी. कोसंबी | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 99 |
| 8 | भारतीय जीनियस भाग – २<br>जगदीशचंद्र बोस, होमी भाभा, लॉरी बेकर, एम.एस. स्वामीनाथन | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 99 |
| 9 | भारतीय जीनियस भाग – ३<br>सी. व्ही. रामन, मेघनाद साहा , चंद्रशेखर, जयंत नारळीकर | अच्युत गोडबोले – दीपा देशमुख | 99 |
| **आनंद घैसास हे टाटा इन्सिटट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त वैज्ञानिक अधिकारी होते** | | | |
| 1 | खेळ खेळूया विज्ञानाचे  भाग – १ | आंनंद घैसास | 80 |
| 2 | खेळ खेळूया विज्ञानाचे  भाग – २ | आंनंद घैसास | 80 |
| 3 | खेळ खेळूया विज्ञानाचे  भाग – ३ | आंनंद घैसास | 80 |
| 4 | युवा विज्ञान कुतूहल भाग – १ | आंनंद घैसास | 90 |
| 5 | युवा विज्ञान कुतूहल भाग – २ | आंनंद घैसास | 90 |
| 6 | युवा विज्ञान कुतूहल भाग – ३ | आंनंद घैसास | 90 |
| 7 | आपले विश्व  (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 8 | दुर्बिणी आणि वेधशाळा (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 9 | खगोलशास्त्रज्ञ | आंनंद घैसास | 150 |
| 10 | आपली सूर्यमाला (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 11 | How to Observe the Sky (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 12 | Our Solar System  (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 13 | Our Universe (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 150 |
| 14 | शास्रज्ञ व्हा भाग – १ (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 70 |
| 15 | शास्रज्ञ व्हा भाग – २ (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 70 |
| 16 | शास्रज्ञ व्हा भाग – ३ (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 70 |
| 17 | शास्रज्ञ व्हा भाग – ४ (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 70 |
| 18 | आपली सूर्यमाला भाग – १ (बहिर्ग्रह) (संपूर्ण रंगीत) | आंनंद घैसास | 90 |

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | आपली सूर्यमाला भाग - २ (लघुग्रह)(संपूर्ण रंगीत) | आनंद घैसास | 90 |
| 20 | आपली सूर्यमाला भाग - ३ (अतग्रह) (संपूर्ण रंगीत) | आनंद घैसास | 90 |
| 21 | आपली सूर्यमाला भाग - ४ (उपग्रह) (संपूर्ण रंगीत) | आनंद घैसास | 90 |
| 22 | आपली सूर्यमाला भाग - ५ (ताऱ्यांचा जन्म-मृत्यू) (संपूर्ण रंगीत) | आनंद घैसास | 90 |
| 23 | आपली सूर्यमाला भाग - ६ (धूमकेतू) (संपूर्ण रंगीत) | आनंद घैसास | 90 |
| **डॉ. जगन्नाथ दीक्षित हे महाराष्ट्र शासनाच्या स्थूलत्व निवारण कार्यक्रमाचे ब्रँड अम्बॅसिडर आहेत. लातूर येथे जनऔषधवैद्यकशास्त्र विभागात प्राध्यापक व विभाग प्रमुख म्हणून कार्यरत.** | | | |
| 1 | मुलांना आरोग्यसाक्षर करणारं मेडिकल जनरल नॉलेज भाग - १ | डॉ. जगन्नाथ व डॉ. अंजली दीक्षित | 90 |
| 2 | मुलांना आरोग्यसाक्षर करणारं मेडिकल जनरल नॉलेज भाग - २ | डॉ. जगन्नाथ व डॉ. अंजली दीक्षित | 90 |
| 3 | मुलांना आरोग्यसाक्षर करणारं मेडिकल जनरल नॉलेज भाग - ३ | डॉ. जगन्नाथ व डॉ. अंजली दीक्षित | 90 |
| 4 | मुलांना आरोग्यसाक्षर करणारं मेडिकल जनरल नॉलेज भाग - ४ | डॉ. जगन्नाथ व डॉ. अंजली दीक्षित | 90 |
| 5 | मुलांना आरोग्यसाक्षर करणारं मेडिकल जनरल नॉलेज भाग - ५ | डॉ. जगन्नाथ व डॉ. अंजली दीक्षित | 90 |
| **अतुल कहाते हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कामाचा सुमारे वीस वर्षांचा अनुभव असलेले आघाडीचे लेखक आहेत.** | | | |
| 1 | बिल गेट्सचं मायक्रोसॉफ्ट | अतुल कहाते | 120 |
| 2 | बखर मोबाइल फोनची | अतुल कहाते | 150 |
| 3 | गुगल | अतुल कहाते | 120 |
| 4 | फेसबुक | अतुल कहाते | 120 |
| 5 | ट्विटर | अतुल कहाते | 99 |
| 6 | ॲमेझॉन | अतुल कहाते | 120 |
| 7 | तंत्रज्ञानाचा ओव्हरलोड | अतुल कहाते | 150 |
| **किशोरवयीन मुलांनी वाचलीच पाहिजेत अशी पुस्तकं** | | | |
| 1 | मेधा पाटकर | सोनाली नावंगुळ | 80 |
| 2 | डॉ. आनंद नाडकर्णी | दीपा देशमुख | 90 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | डॉ. प्रकाश आमटे | दीपा देशमुख | 85 |
| 4 | अरविंद गुप्ता | दीपा देशमुख | 70 |
| 5 | अच्युत गोडबोले | दीपा देशमुख | 90 |
| 6 | डॉ. अनिल अवचट | दीपा देशमुख | 90 |
| 7 | आर. के. लक्ष्मण | मधुकर धर्मापुरीकर | 70 |
| 8 | अण्णा हजारे | स्वाती महाळंक | 70 |
| 9 | रतन टाटा | सविता दामले | 85 |
| 10 | नारायण मूर्ती | अतुल कहाते | 70 |
| 11 | ज्ञानेश्वर मुळे | दीपा देशमुख | 70 |
| 12 | पी.व्ही. सिंधू | संजय डोंगरे | 80 |
| 13 | एम.एस. धोनी | श्रीपाद बह्मे | 70 |
| 14 | अमर्त्य सेन | अतुल कहाते | 70 |
| 15 | विक्रम गायकवाड | नीलिमा बोरवणकर | 70 |
| 16 | फिडेल कॅस्ट्रो | अतुल कहाते | 80 |
| 17 | जे. के. रोलिंग | पूनम छत्रे | 80 |
| 18 | शर्मिला इरोम | सविता दामले | 70 |
| 19 | मर्दानी झांशीवाली | विठ्ठलराय भट | 60 |
| 20 | नेताजी सुभाषचंद्र बोस | विठ्ठलराय भट | 90 |
| | **आपले समाजसुधारक** | | |
| 1 | राजयोगिनी अहिल्याबाई होळकर | विठ्ठलराय भट | 60 |
| 2 | महर्षी धोंडो केशव कर्वे | संध्या रानडे | 90 |
| 3 | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | लीला शहा | 50 |
| | **शिकण्याची आणि शिकवण्याची इच्छा असणाऱ्यांसाठीः** | | |
| 1 | टीचर | लेखिका – सिल्व्हिया अश्टॅन–वॉर्नरर, अनुवाद – अरुण ठाकूर | 150 |
| 2 | एक समृद्ध शाळेचा प्रवास | सकल्पना – कबीर वाजपेयी, अनुवाद– विनिता गनबोटे | 400 |
| 3 | प्रिय बाई –बार्बियानाची शाळा | अनुवाद – सुधा कुलकर्णी | 120 |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | माय कंट्री स्कूल डायरी | ज्युलिया वेबर गॉर्डन , अनुवाद - विद्या भागवत | 250 |
| 5 | एकत्रित विचार करू या | मूळ लेखिका -अहिल्या चारी, अनुवाद-अनुजा हर्डीकर | 120 |
| 6 | खऱ्या शिक्षणाच्या शोधात | मूळ लेखक- डेव्हिड ग्रिबल, अनुवाद- डॉ. वृंदा चापेकर | 350 |
| 7 | मुलं नापास का होतात? | मूळ लेखक- जॉन होल्ट, अनुवाद- सुजाता गोडबोले | 200 |
| 8 | शिक्षण आणि शांती | मूळ लेखक- जेन साही, अनुवाद- शोभा भागवत | 130 |
| 9 | सागरशाळा | लेखक- देवेंद्र कांदोळकर | 150 |
| 10 | जे. कृष्णमूर्ती आणि कृष्णमूर्ती स्कूल | लेखक- हेरंब कुलकर्णी | 220 |
| 11 | शिक्षकांसाठी साने गुरुजी | लेखक- हेरंब कुलकर्णी | 160 |
| 12 | आमच्या शिक्षणाचं काय? | लेखक- हेरंब कुलकर्णी | 290 |
| 13 | शिकू या आनंदे | लेखिका - रेणू दांडेकर | 120 |
| 14 | प्रिय मुख्याध्यापक | लेखक - शंकर मुसाफिर , अनुवाद- डॉ. प्रदीप गोटुस्कर | 120 |
| 15 | शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी | लेखिका - सुचिता पडळकर | 180 |
| 16 | दिवास्वप्न | मूळ लेखक- गिजुभाई बधेका, अनुवाद- निरंजन घाटे | 100 |
| 17 | शिक्षणाचे जादूई बेट | लेखक - डॉ. अभय बंग, इंग्रजी अनुवाद- अरविंद गुप्ता | 50 |
| 18 | शाळेपासून मुक्ती वर्षापुरती | लेखक - राहुल अल्वारिस, अनुवाद - उषाः प्रभा पागे | 90 |
| 19 | आपलं जग बदलणारी मुलं | लेखिका - अनुराधा मोहनी | 95 |
| 20 | कहाणी शब्दांची | लेखक सदानंद कदम | 200 |
| 21 | परदेशी शिक्षणातील भ्रम आणि वास्तव | डॉ. श्रीराम गीत, शब्दांकन- पूनम छत्रे | 120 |
| 22 | स्पोर्टस करिअर | लेखक - डॉ. श्रीराम गीत, आशिष पेंडसे, शब्दांकन - पूनम छत्रे | 160 |
| | **गणिताला मित्र बनवणारी पुस्तके** | | |
| 1 | किमया गणितमैत्रीची | मूळ लेखक-जेन पोर्टमन व जेरेमी रिचर्डसन, अनुवाद - डॉ. मधुकर देशपांडे | 120 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | दिनदर्शिकेमधली जादू | लेखक - पी. के. श्रीनिवासन, अनुवाद- डॉ. मधुकर देशपांडे | 60 |
| 3 | १०० चौरसांचे अनेक प्रयोग | मूळ लेखक- लेह मिलड्रेड बिअर्डस्ले, अनुवाद - नागेश शंकर मोने | 150 |
| 4 | आळशी माणसाचा विषय - गणित | लेखक - डॉ. प्रकाश जोशी | 160 |
| 5 | ग गणिताचा | पद्मश्री अरविंद गुप्ता | 80 |
| | **विज्ञान समजून घेण्यासाठी** | | |
| 1 | युनेस्को- विज्ञान घरातलं, विज्ञान शाळेतलं | लेखक-भास्कर धोंडो केशव कर्वे आणि केव रामचंद्र पालकर | 170 |
| 2 | स्टोरी ऑफ फिजिक्स भौतिक विज्ञानातील शोधांच्या मनोरंजक गोष्टी | मूळ लेखक- थनू पद्मनाभन, अनुवाद- नंदू फडके | 60 |
| | **मजेदार-सोपे विज्ञान प्रयोग** | | |
| 1 | रोचक विज्ञान | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 2 | विज्ञानातील चमक | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 3 | छोटी खेळणी, मोठे विज्ञान | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 4 | विज्ञानातील मोती | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 5 | Gems of Science | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 6 | Fun with Science | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| 7 | Science Sparks | लेखक- अशोक रुपनेर, चित्रांकन-रेश्मा बर्वे, | 60 |
| | **शालेय विज्ञान प्रकल्पाविषयी** | | |
| 1 | निर्मितीचं आकाश | लेखिका - रेणू दांडेकर | 80 |
| 2 | शोध आणि बोध | लेखक - हेमंत लागवणकर | 99 |
| 3 | प्रोजेक्ट फंडा | लेखक - हेमंत लागवणकर | 90 |
| 4 | ८०० शालेय प्रकल्प | लेखिका - रेणू दांडेकर | 99 |
| | | | |
| 1 | लेकीला उत्तर हवंय | अनु गुप्ता, अनुवाद - सविता दामले | 120 |
| 2 | अवयव बोलू लागतात | डॉ. यश वेलणकर | 150 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **निसर्ग विज्ञान पुस्तकमाला** | | |
| 1 | आपले पर्यावरण | लेखक - अरुण जोशी | 60 |
| 2 | भारतातील सस्तन प्राणी | लेखक - डॉ. शशिकुमार मेनन | 100 |
| 3 | वनस्पतीजगातून सहल | लेखक - सी.एस लट्टू | 80 |
| | **किशोरांसाठी रहस्यकथा** | | |
| 1 | हरित द्वीपाचा राजा | मूळ लेखक - सुनील गंगोपाध्याय,<br>अनुवाद - रंजना पाठक | 140 |
| 2 | हरी, पटल आणि गोऱ्या साहेबांची कबर | लेखक - शीर्षेन्दु मुखोपाध्याय,<br>अनुवाद - रंजना पाठक | 100 |
| 3 | गुप्तधनाच्या शोधात | लेखक - सुचित्रा भट्टाचार्य, अनुवाद - रंजना पाठक | 100 |
| | **इंग्रजी भाषेवर मिळवा प्रभुत्व** | | |
| 1 | अचूक इंग्रजी कसे बोलावे आणि लिहावे | लेखक - आय.पी. अत्तरदे | 80 |
| 2 | मनोविकास तर्खडकर इंगिलश कोर्स<br>(भाग १ ते ३ एकत्र) शब्दसंग्रह,निबंध लेखन पत्रलेखन,<br>सारांश लेखन, म्हणी वाक्प्रचार, अलंकार | संपादन व लेखन - व्ही.पी. कामतकर | 225 |
| 3 | उत्कृष्ट इंग्रजी कसे बोलावे आणि लिहावे<br>(भाग १ ते ३) | लेखक - आय.पी अत्तरदे | 299 |
| 4 | नित्योपयोगी व्यावहारिक शब्दकोश | लेखक - प्रकाश अल्मेडा | 100 |
| | **वाचन-लेखन संस्कार करणारी पुस्तकं** | | |
| 1 | वाचनविकास भाग - १ | लेखक - ब. गि. पाटील, कविता अनंत भावे | 50 |
| 2 | वाचनविकास भाग - २ | लेखक - ब. गि. पाटील, कविता अनंत भावे | 51 |
| 3 | सुंदर अक्षर लेखन सराव | लेखक - सुभाष जमदाडे | 30 |
| 4 | सुंदर अक्षर कसे काढावे | लेखक - सुभाष जमदाडे | 70 |
| 5 | वाक्प्रचार | लेखक जगन्नाथ जाधव | 70 |
| 6 | म्हणी | लेखक जगन्नाथ जाधव | 50 |
| 7 | हेही दिवस जातील | डॉ. आनंद नाडकर्णी | 100 |
| 8 | मॉंटुकले दिवस | लेखक - संदेश कुलकर्णी | 150 |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | ससुल्या | लेखन – प्रसाद मणेरीकर , चित्रे – गोपाळ नांदूरकर | 60 |
| 10 | रानातले पाहुणे | लेखन – प्रसाद मणेरीकर , चित्रे – गोपाळ नांदूरकर | 60 |
| 11 | रानातल्या गोष्टी | लेखन – प्रसाद मणेरीकर , चित्रे – गोपाळ नांदूरकर | 60 |
| 10 | पंचतंत्र भाग – १ | संकलन – रमेश दिघे | 60 |
| 11 | पंचतंत्र भाग – २ | संकलन – रमेश दिघे | 60 |
| 12 | पंचतंत्र भाग – ३ | संकलन – रमेश दिघे | 60 |
| 13 | इसापनीती | लेखन – प्रभु गोखले | 99 |
| 14 | इसापनीती भाग – १ | संकलन – रमेश दिघे | 70 |
| 15 | इसापनीती भाग – २ | संकलन – रमेश दिघे | 71 |
| 16 | इसापनीती भाग – ३ | संकलन – रमेश दिघे | 72 |
| 17 | इसापनीती भाग – ४ | संकलन – रमेश दिघे | 73 |
| 18 | डार्विनचे आत्मचरित्र | अनुवाद – डॉ. सविता घाटे, विनिता गनबोटे | 60 |
| 19 | बहुरूप गांधी | लेखक – अनु बंदोपाध्याय | 150 |
| | **जंगल सफर घडवणारी धम्माल पुस्तकं** | | |
| 1 | जंलाचा राजा वाघ (संपूर्ण रंगीत) | अतुल धामनकर | 180 |
| 2 | जंलाचा राजा सिंह (संपूर्ण रंगीत) | अतुल धामनकर | 180 |
| 3 | जंलाचा राजा कान्हा (संपूर्ण रंगीत) | अतुल धामनकर | 360 |
| | **धम्माल गोष्टी** | | |
| 1 | मुलांसाठी यशाच्या गोष्टी | लेखक – सुरेश वांदिले | 60 |
| 2 | अज्जब गोष्टी गज्जब गोष्टी | लेखक – अनंत भावे | 90 |
| 3 | भारतीय भाषांतील धम्माल गोष्टी | लेखिका – कृपा कुलकर्णी | 90 |
| 4 | दाक्षिणात्य बिरबल तेनाली रमण | लेखिका – आशा भालेकर | 60 |
| 5 | बिरबल – बादशहा | आशा भालेकर | 100 |
| 6 | गावाकडं | कवि – इंद्रजित भालेराव | 90 |

**Web site : www.manovikasprakashan.com**